|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

### बातमी क्र.१

जळगाव दि.५ प्रतिनिधी ) :- संशोधक विद्यार्थ्यांनी विज्ञानामधील नवे बदल लक्षात घेवून समाजपयोगी संशोधन करण्यावर भर द्यावा असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रसायन शास्त्रज्ञ प्रा.डी.डी.ढवळे यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेच्या वतीने आज दि.५ मार्च पासून घ्इनोव्हेशन्स् इन केमिस्ट्रीः लॅबोरेटरी टू सोसायटी ङ या विषयावरील राष्ट्रीय परिषदेला प्रारंभ झाला. या परिषदेचे उद्‌घाटन करताना प्रा.ढवळे बोलत होते. प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर अध्यक्षस्थानी होते. प्रा.ढवळे म्हणाले की,विज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी बदलांकडे गांभिर्याने बघण्याची गरज आहे. समाजाला उपयुक्त होईल अशा प्रकारचे संशोधन करण्यावर भर देण्याची गरज आहे. संशोधन, शिक्षण ही समाजाप्रती बांधिलकी असण्याची गरज आहे.

अध्यक्षीय भाषणात प्रा.माहुलीकर यांनी रसायनशास्त्र प्रशाळेच्या आजवरच्या वाटचालीबद्दल समाधान व्यक्त केले. संशोधन, अध्यापन आणि विस्तारीत सेवा यामुळे संस्थेचा विकास होत असतो. उमविमध्ये टीमवर्क आणि कार्यसंस्कृती असल्यामुळे या विद्यापीठाचे वेगळेपण सिध्द झाले आहे. या परिषदेची भूमिका
निमंत्रक डॉ.दीपक दलाल यांनी मांडली. प्रशाळेचे संचालक प्रा.डी.एच.मोरे यांनी प्रशाळेविषयी माहीती दिली. यावेळी मंचावर प्रा.रत्नमाला बेंद्रे, व्ही.व्ही.गीते उपस्थित होते. प्रा.जी.ए.उस्मानी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. ए.एम.पाटील यांनी आभार मानले. उद्‌घाटनानंतर प्रा.ढवळे यांचे बीजभाषण झाले. त्यानंतर प्रा.रेखा सिंघल, प्रा.एन.जे.परमार यांचे व्याख्यान झाले. उदया या परिषदेचा समारोप होणार आहे.

---

### बातमी क्र.२

जळगाव दि. ५ (          ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यशास्त्र प्रशाळेअंतर्गत डिपार्टमेंट ऑफ परफार्मिंग आर्टस् ॲण्ड फाईन आर्टस् विभागातर्फे शनिवार, दि.१० मार्च २०१८ रोजी सुप्रसिध्द संगीतकार कौशल ईनामदार यांच्या उपस्थितीत, संगीत नियोजनातील बारकावे व सादरीकरणाचे तंत्र या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

संगीतकार कौशल ईनामदार यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता या चर्चासत्राचे उद्‌घाटन होणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील राहतील. प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर हे देखील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. संगीताच्या आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंदणीसाठी प्रा.संजय पत्की (९४०५४४०५५५), प्रा.अलका चव्हाण (९२२३९७३२९९), तेजस मराठे (९४२२२ ३५४५८)यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्रशाळेचे संचालक डॉ.तुकाराम दौड व विभागप्रमुख प्रा.संजय पत्नी केले आहे.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. ५ मार्च, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत /-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी